# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ०१

web: www.dhepune.gov.in E-mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.०२०/२६१२६९३९ फॅक्स ०२०/२६१११११५३


क्र.उशिसं/शिष्य-२०१८/डीबीटी/ 14345 दि.०४/११/२०१९

04 NOV 2019

**तात्काळ ईमेलद्वारा**

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण विभाग.

२. सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई.

**विषय :- उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणे बाबत...**

**संदर्भ :-** १. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०११४,दि. ३०.०७.२०१९
२. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०२०७,दि. ३१.०७.२०१९
३. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०६९५,दि. ९.०८.२०१९
४. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१०८०२,दि. २०.०८.२०१९
५. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१३५६९,दि. ७.१०.२०१९
६. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१३८३४,दि. १५.१०.२०१९
७. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९/डीबीटी/१४२६२,दि. १.११.२०१९

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्यशासनाच्या शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. विद्यार्थी / महाविद्यालयांच्या मदतीसाठी डीबीटी पोर्टलवर व्हिडीओ, मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तसेच संदर्भिय संचालनालयाच्या पत्रान्वये वेळोवेळी लेखी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

महाडीबीटी पोर्टलवरुन महाविद्यालयांनी त्यांचे डीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करणे / महाविद्यालयातील अभ्यासक्रमाच्या शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक / शिक्षण शुल्क समिती / FRA यांचेकडून मंजूरी घेणे, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन शिष्यवृत्ती अर्ज भरणे, सदर अर्जांची महाविद्यालयाच्या लिपीक व प्राचार्य तसेच विभाग स्तरावरुन पडताळणी करणे याबाबत अंतिम मुदत खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | अंतिम मुदत |
|---|---|---|
| ०१ | महाविद्यालयांनी त्यांचे डीबीटी पोर्टलवर प्रोफाईल अद्ययावत करणे / महाविद्यालयातील अभ्यासक्रमाच्या शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक / शिक्षण शुल्क समिती / FRA यांचेकडून मंजूरी घेणे. | दि. १५.११.२०१९ |
| ०२ | विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्तीसाठी अर्ज भरणे. | दि. १५.११.२०१९ |
| ०३ | महाविद्यालय / विद्यापीठ / संस्था यांनी त्यांचे लिपीक व प्राचार्य यांचे लॉगीनवरुन अर्जांची पडताळणी करणे. | दि. ३०.११.२०१९ |
| ०४ | विभागीय सहसंचालक यांनी त्यांचे लॉगीनवरुन अर्जांची पडताळणी करणे. | दि. ५.१२.२०१९ |

संचालनालयाच्या संदर्भिय पत्रान्वये कळविल्यानुसार, आपल्या विभागामधील विद्यापीठे / महाविद्यालय / संस्था यांना त्यांचे डीबीटी प्रोफाईल अद्ययावत करुन, अभ्यासक्रमाचे शुल्कास संबंधित विभागीय सहसंचालक कार्यालय / बीएड - बीपीएड अभ्यासक्रमाबाबत शिक्षण शुल्क समिती / विधी अभ्यासक्रमाबाबत FRA यांचेकडून मान्यता घेण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली असल्याबाबतचा पूर्तता अहवाल त्वरीत संचालनालयास सादर करावा.

दि. ४.११.२०१९ रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड नुसार, खालील प्रमाणे विभाग निहाय पडताळणीसाठी अर्ज प्रलंबित असल्याचे आढळून येत आहे.

| अ. क्र. | विभागाचे नांव | प्राप्त अर्जांची संख्या | संस्था स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या | विभाग स्तरावर प्रलंबित अर्जांची संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | अमरावती | 4830 | 3105 | 178 |
| २ | औरंगाबाद | 27761 | 14273 | 2968 |
| ३ | जळगांव | 4978 | 2957 | 204 |
| ४ | कोल्हापूर | 37804 | 14241 | 9880 |
| ५ | मुंबई | 1401 | 801 | 77 |
| ६ | नागपूर | 4869 | 1866 | 604 |
| ७ | नांदेड | 18559 | 8582 | 3210 |
| ८ | पनवेल | 2892 | 1945 | 524 |
| ९ | पुणे | 38199 | 24124 | 9615 |
| १० | सोलापूर | 10000 | 3665 | 2394 |
| | **एकूण** | **151293** | **75559** | **29654** |

तरी शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थ्यांना शक्य तितक्या लवकर महाडीबीटी पोर्टलवरुन अर्ज भरणेबाबत त्यांचे महाविद्यालयामार्फत कळविण्यात यावे. तसेच संस्था तसेच विभागीय सहसंचालक कार्यालयांनी त्यांचे लॉगीनमध्ये पडताळणीसाठी उपलब्ध असलेल्या अर्जांची रोजच्या रोज (daily basis) पडताळणी करणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत महाविद्यालय तसेच विभाग स्तरावरील लॉगीनवर शिष्यवृत्ती अर्ज पडताळणीसाठी प्रलंबित राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - १.

प्रत :-
१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ३२ यांना माहितीस्तव सादर.
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.
३. प्राचार्य, सर्व शासकीय,अशासकीय अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालये यांना तात्काळ कार्यवाहीसाठी.